Maharashtra State Board Of Secondary
& Higher Secondary Education
Latur Divisional Board
Latur-413531

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिकशिक्षण मंडळ, लातूर
विभागीय मंडळ, लातूर- ४१३५३१

सुतमिल एरिया,कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानननगर, लातूर
Divisional Chairman Ph :( O2382) 229258 Divisional Secretary Ph :( O2382) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com

जा.क.लाविमं / माध्य.मान्यता / 1770
दिनांकः– 02/09/2026

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
नांदेड / धाराशिव / लातूर

**विषयः– माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना वर्धित मंडळ मान्यता देण्याची प्रकिया ऑनलाईन पद्धतीने करणेबाबत..................**
**संदर्भः– कमांक –रा.म. /परीक्षा –3 / 3230, पुणे दिनांक 31 / 07 / 2026**

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना मान्यता वर्धित देण्याची प्रकिया ऑनलाईन पद्धतीने करणेबाबत निर्देष प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार दिनांक 01 / 08 / 2026 पासून मान्यता वर्धित बाबतचे प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने स्विकारण्यात येत असून त्यासाठी शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळाचे संकेतस्थळ **www.mahahsscboard.in** वर आपल्या institute log-in वरून wardhit manyata या लिंकद्वारे सदर प्रस्ताव मंडळाकडे पाठवावेत. सदर प्रस्तावासोबत खालील प्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करावी.

1. **शाळेचे लेटरहेड मंडळ मान्यता वर्धित करून मिळणेबाबत मागणी पत्र.**
2. **इ.10 वी साठी विनियम कमांक 28 / 16, व इ.12 वी साठी विनियम कमांक 66 / 9 शाळा / कनिष्ठ महाविद्यालय नुतनिकरण /वर्धित बाबत अर्ज.**
3. **मंडळाकडून देण्यात आलेली प्रथम मंडळ मान्यता पत्राची प्रत.**
4. **मंडळाकडून देण्यात आलेली शेवटची मंडळ मान्यता वर्धित पत्राची प्रत.**
5. **शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाचा चालू वर्षाचा व मागील वर्षाचा तपासणी अहवाल.**
6. **घोषणापत्र / हमीपत्र.**
7. **वर्धित शुल्क रूपये 2000 /– प्रति वर्ष.**

तेंव्हा शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी मंडळ मान्यता वर्धित केल्याशिवाय इ.10वी व इ.12वी फेब्रु / मार्च 2027 ची आवेदनपत्रे स्विकारले जाणार नाहीत. विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस आपण स्वतः जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

सोबतः– user manual (माहिती पुस्तीका)

विभागीय सचिव
लातूर विभागीय मंडळ, लातूर

**प्रत माहितीस्तवः–**
1.शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर.
2.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),नांदेड / लातूर / धाराशिव.

58 2026 letter A.S.